# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक २२२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.०५ सप्टेंबर २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## मिलिंद देवरा यांच्या 'त्या' पत्रावर संजय राऊतांचा आक्षेप

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- शिवसेनेचे (शिंदे) राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनी मुंबईत झालेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनावरुन नाराजी व्यक्त केली आहे. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून 'इथून पुढे आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी बंदी घालावी', अशी मागणी केली आहे.

मिलिंद देवरा यांच्या या पत्रावर शिवसेनेचे (उबाठा) खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, 'मिलिंद देवरा यांनी घेतलेल्या भूमिकेविषयी त्यांच्या नेत्यांचं म्हणणं काय आहे हे मराठी माणसाला जाणून घ्यायला आवडेल. तुम्ही मराठी माणसाला मुंबईत येऊ नका म्हणताय? आम्ही मराठी माणसं मुंबईत आंदोलन करू, नाहीतर हैदोस घालू, आम्हाला विचारणारे तुम्ही कोण? बाकी न्यायालयाचा त्यावर आक्षेप असेल तर आम्ही व न्यायालय ते बघून घेऊ. मुंबईत आंदोलनाला येत असताना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी देखील आम्हाला रोखलं नाही आणि तुम्ही आम्हाला अडवताय? असे संजय राऊत म्हणाले.

# सरकारच्या जीआरविरोधात ओबीसी समाज, संघटनांची आक्रमकता कायम

## ओबीसी समाजावरील अन्याय कदापीही खपवून घेणार नाही

### सकल ओबीसी समाजाचा इशारा

वाशीम दि.४ (प्रतिनिधी)- ओबीसी आरक्षणाची मर्यादा वाढविण्याची गरज असताना शासनाने मराठा समाजाला ओबीसीत समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा केला. हा सर्व ओबीसी समाजावर मोठा अन्याय आहे. हा अन्याय कदापीही खपवून घेणार नाही, असा इशारा देत सकल ओबीसी समाजाने आक्रमक भूमिका घेतली. वाशीम जिल्हाधिकारी कार्यालयावर गुरुवारी धडक देत विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनामार्फत मुख्यमंत्र्यांना सादर केले.

शासनाने ०२ सप्टेंबर २०२५ रोजी शासन निर्णय काढून मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा मार्ग मोकळा केला. हा निर्णय मूळचे समस्त ओबीसी समाजावर अन्याय करणारा आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले. हा शासन निर्णय तत्काळ रद्द करावा, अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक, बेकायदेशीर व असंवैधानिक आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजातील सुमारे ४०० हून अधिक जातींच्या हक्कांवर गदा येणार असून, त्यांना शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात मिळणारे प्रतिनिधित्व गंभीर स्वरूपात घटणार आहे. याबाबत घेतलेल्या हरकतीमध्ये अनुच्छेद १५ (४) व १६ (४) प्रमाणे आरक्षण हे फक्त सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांना देता येते. मराठा समाजाचा समावेश हा या तत्त्वांचा भंग आहे. अन्यायकारक परिणाम आधीच मर्यादित संधी असलेल्या ओबीसी समाजातील घटकांना आणखी मागे ढकलले जाईल. सर्वोच्च न्यायालय व विविध आयोगांनी स्पष्ट केले आहे की केवळ राजकीय दबावाखाली जातींचा समावेश आरक्षणात करता येत नाही.

### समता परिषद राज्यभर आंदोलन छेडणार

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे ओबीसी समाजात नाराजीचं वातावरण निर्माण झालं आहे. याच पार्श्वभूमीवर आता मंत्री छगन भुजबळ यांच्या समता परिषदेकडून ओबीसींच्या न्यायहक्कासाठी राज्यभर आंदोलन छेडण्याची घोषणा करण्यात आली आहे. 'मराठ्यांना आरक्षण द्यायलाच हवं, मात्र ते ओबीसींच्या ताटातलं नको,' ही छगन भुजबळ यांची भूमिका रास्त असल्याचं मत समता परिषदेकडून व्यक्त करण्यात आलं आहे.

राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत घेतलेल्या निर्णयावर छगन भुजबळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, या निर्णयाविरोधात न्यायालयात जाण्याचाही इशारा त्यांनी दिला आहे. ओबीसी आरक्षणावर कोणतेही गालबोट न लागू देता, संविधानिक मार्गानेच मराठा समाजाला आरक्षण दिलं जावं, ही त्यांची ठाम भूमिका आहे. ओबीसी समाजाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी भुजबळ कटिबद्ध असून, मंत्रीपदापेक्षा त्यांना ओबीसी नेता म्हणून ओळख मिळणं महत्त्वाचं वाटतं, असं समता परिषदेकडून सांगण्यात आलं आहे.

# भाजपने मनोज जरांगेंना गंडवले, फसवले

## उपसमिती, शिंदे समिती, मराठे, कुणबी सर्वांचीच फसवणूक केल्याचा आंबेडकरांचा दावा



मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मनोज जरांगे यांच्यासह सर्वांनाच गंडवल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला 'कुणबी' संबोधण्याचा जीआर काढून मोठा गाजावाजा केला. भाजपने असा आव आणला की, न सुटणारा प्रश्न त्यांनी सोडवला. मात्र प्रत्यक्षात हा निर्णय गंडवणारा व फसवणारा आहे, असे त्यांनी म्हटले आहे. आंबेडकरांनी याविषयी हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाच्या विविध निर्णयांचा दाखला दिला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न खरेच सुटला काय? याविषयी साशंकता निर्माण झाली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण केले. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने एक जीआर काढला. त्या जीआरद्वारे सरकारने हैदराबाद गॅझेट लागू केल्याची घोषणा केली. या जीआरमुळे मराठवाड्यातील सर्वच मराठा समाजाचे कुणबीमध्ये रुपांतर होऊन त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळेल असा दावा केला जात होता. पण आता या जीआरवर वेगवेगळी मतमतांतरे येत आहेत. कायदेतज्ज्ञ तथा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही सरकारचा हा जीआर गंडवणारा व फसवणारा असल्याचा आरोप केला आहे.

# मराठा समाजाला काहीही नवे मिळाले नाही

## मराठा आंदोलक विनोद पाटील यांचा पुनरुच्चार

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने काढलेल्या जीआरमुळे मराठा समाजाला काहीही नवे मिळाले नाही, असा पुनरुच्चार मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी केला आहे. कालच्या जीआरमुळे समाजाला काहीही नवे मिळाले नाही. त्यामुळे मी लवकरच सक्षम वकिलांची फौज घेऊन न्यायालयात दाद मागणार आहे. मी समाजाचे खच्चीकरण व फसगत अजिबात होऊ देणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण केले. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने एक जीआर काढला. त्या जीआरद्वारे हैदराबाद गॅझेट लागू करण्याची घोषणा केली. सरकारच्या या निर्णयाचा मराठवाड्यातील मराठा समाजाला लाभ मिळण्याचा दावा केला जात आहे. पण सामाजिक कार्यकर्ते विनोद पाटील यांनी या जीआरचा मराठा समाजाला टाचणीएवढाही फायदा होणार नसल्याचा दावा करत नव्या वादाला फोडणी दिली आहे. या प्रकरणी मनोज जरांगेंनी त्यांच्यावर शिवराळ भाषेत टीका केली. पण त्यानंतरही विनोद पाटील यांनी आपण आपल्या विधानावर ठाम असल्याचा पुनरुच्चार केला आहे.

# सातारा गॅझेटिअरबाबत निर्णय न झाल्यास रस्त्यावर फिरू देणार नाही-मनोज जरांगे

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील आठ मागण्यांपैकी सहा मागण्या राज्य सरकारने मान्य करत त्यासंदर्भात शासन निर्णय (जीआर) जारी केला आहे. या निर्णयानंतर गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेत समाधान व्यक्त केले. मंगळवारी सायंकाळी, राज्यभरात विविध ठिकाणी मराठा समाजाकडून या निर्णयाचं सेलिब्रेशन करण्यात आलं. सहा महत्त्वाच्या मागण्या मान्य झाल्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये आनंदाचं वातावरण होतं.मात्र, सरकारच्या या जीआरला आता ओबीसी नेत्यांकडून तीव्र विरोध होऊ लागला आहे. विशेषतः मंत्री छगन भुजबळ यांनी या जीआरविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. तर ओबीसी समाजाची नाराजी दूर करण्यासाठी सरकारने उपसमिती गठीत केली आहे. यावर भाष्य करताना मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला थेट इशारा दिलाय. तर छगन भुजबळ यांच्यावर देखील मनोज जरांगे पाटील यांनी निशाणा साधला.



छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ओबीसीत मराठ्यांना मीच घालणार आहे. ओबीसी समाजाला जसं तुम्ही उपसमिती गठीत केली. तशीच दलित, मुस्लिमांसाठी उपसमिती गठीत करा. एक शेतकऱ्यांसाठी, आदिवासी आणि मायक्रो ओबीसींसाठी करा. गरीबांचे कल्याण होऊ द्या, असे त्यांनी म्हटले.

गेल्यावेळी ओबीसी उपसमितीच्या अध्यक्षपदी छगन भुजबळ यांची नेमणूक करण्यात आली होती. यंदा मात्र चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे छगन भुजबळ यांचे पंख कापल्याची चर्चा रंगली आहे याबाबत विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले की, भुजबळ म्हणजे पक्षाचं अस्तित्व संपवणारा माणूस आहे. कार्यकर्त्यांचे अस्तित्व संपवणारा माणूस आहे. त्यामुळे बावनकुळे साहेब त्यांना चांगले वाटले असतील. (पान ४ वर)

# वडील धोरण बनवतात आणि मुले त्यातून पैसे कमावतात

### इथेनॉल धोरणावरून नितीन गडकरींवर काँग्रेसची टीका

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- इथेनॉल धोरणामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. अशात, आता गुरुवारी काँग्रेसने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यावर मोठा हल्लाबोल केला. काँग्रेसने म्हटले आहे की, नितीन गडकरी यांच्या मुलांच्या इथेनॉल उत्पादक कंपन्यांनी गेल्या काही काळात वेगाने पैसे कमवले आहेत.

काँग्रेस प्रवक्ते पवण खेरे यांनी आज पत्रकार परिषदेत म्हटले की, 'निखिल गडकरी आणि सारंग गडकरी हे नितीन गडकरी यांचे पुत्र आहेत. नितीन गडकरींच्या दोन्ही पुत्रांच्या सियान अॅग्रो इंडस्ट्रीज अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि मानस अॅग्रो इंडस्ट्रीज अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपन्या इथेनॉलचे उत्पादन करतात. सरकारमध्ये असलेले वडील धोरणे बनवत आहेत आणि मुले पैसे कमवत आहेत.'

काँग्रेस नेते पवन खेरा म्हणाले की, 'जून २०२४ मध्ये निखिल गडकरी यांची कंपनी सियान अॅग्रोचा महसूल १८ कोटी रुपये होता, जो जून २०२५ मध्ये वाढून ७२३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. जानेवारी २०२५ मध्ये या कंपनीच्या शेअरची किंमत ३७ रुपये होती, जी आता ६३८ रुपये झाली आहे.'

# मराठा समाजाचा जीआर सरसकटचा नाही

## खरे कुणबी असणाऱ्यांनाच आरक्षण मिळेल; मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर सरकारने काढलेल्या जीआरविषयी वेगवेगळे मतमतांतरे व्यक्त केली जात असताना आता स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा जीआर मराठा समाजाला आरक्षणाचा सरसकटचा लाभ देणारा नसल्याचे स्पष्ट केले आहे राज्य सरकारने मराठा आरक्षणाविषयी काढलेला जीआर सरसकटचा नाही. या प्रकरणी जे खरे कुणबी असतील त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळेल. या प्रकरणी कुणालाही खोटेपणा करता येणार नाही, असे ते म्हणालेत.

मराठा आरक्षणाशी संबंधित सरकारने काढलेल्या जीआरवर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. अनेकांनी हा जीआर दिशाभूल करणारा असल्याचा आरोप केला आहे. पण स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी या जीआरमुळे मराठवाड्यातील मराठ्यांचे भले झाल्याचा दावा केला आहे. विशेषतः या प्रकरणी ओबीसी नेते तथा मंत्री छगन भुजबळ नाराज झाल्याची चर्चा आहे. त्यांनी या प्रकरणी कॅबिनेटलाही दांडी मारली आहे. पत्रकारांनी गुरूवारी हा मुद्दा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे उपस्थित केला. त्यावर त्यांनी भुजबळ नाराज नसल्याचे नमूद करत सरकारचा जीआर सरसकट आरक्षण देणारा नसल्याचे स्पष्ट केले.

मुख्यमंत्री या मुद्यावर भाष्य करताना म्हणाले, छगन भुजबळ हे मंत्रिमंडळातून कुठेही निघून गेले नाहीत. त्यांची व माझी चर्चा झाली. मी त्यांना आश्वस्त केले आहे की, सरकारच्या (पान ४ वर)

# जीएसटीमध्ये बदल करणे हा स्वातंत्र्यानंतरचा सर्वात मोठा निर्णय-पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- जीएसटी बदलांवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. दिल्लीतील एका कार्यक्रमात मोदी यांनी जीएसटीमध्ये बदल करणे हा स्वातंत्र्यानंतरचा सर्वात मोठा निर्णय आहे, असे म्हटले आहे.

जीएसटी आता आणखीन सरळ, सुटसुटीत झाला आहे. दिवाळीपूर्वी भारतीयांना डबल धमाका अनुभवता येणार आहे. जीएसटीमध्ये आता ५ आणि १८ टक्के असे दोनच स्लॅब उरले आहेत. यामुळे नागरिकांसोबतच व्यापाऱ्यांनाही जीएसटी सोपा झाला आहे. जीएसटी २.० ची ही व्यवस्था घरे, छोटे व्यापारी आणि उद्योगांना दिलासा देणारी आहे, असे मोदी म्हणाले.

मागच्या सरकारांद्वारे वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर कर आकारला जात होता. मी सत्तेत येण्यापूर्वी काँग्रेसचे सरकार होते, ते स्वयंपाक घरातील वस्तू, शेतमाल असेल की औषधे यावर वेगवेगळे कर आकारत होते. आज जर तो काळ असता तर तुम्हाला १० रुपयांच्या वस्तूवर २०-२५ टक्के कर भरावा लागला असता. आमच्या सरकारने सामान्यांच्या आयुष्यात जास्तीत (पान ४ वर)

# नागपूरमधील ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण सहाव्या दिवशी मागे

नागपूर दि.४ (प्रतिनिधी)- एकीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरु केले होते. तर दुसरीकडे मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे संविधान चौकात बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात गेल्या सहा दिवसांपासून साखळी उपोषण सुरु करण्यात आले होते. आज मंत्री अतुल सावे यांनी उपोषण स्थळी भेट दिली. ओबीसी समाजाच्या



१४ मागण्यांपैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्याची माहिती अतुल सावे यांनी दिल्यानंतर बबनराव तायवाडे यांनी अखेर उपोषण मागे घेतले.

अतुल सावे म्हणाले की, ओबीसी आरक्षणाला गदा येणार नाही याची काळजी घेतली आहे. शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने जे नुकसान झाले त्यावर प्रक्रिया सुरु केली आहे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा विषय आम्ही अर्थ मंत्रालयाकडे पाठवला आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने आपल्या एकूण १४ मागण्या मांडल्या आहेत. ओबीसी वसतिगृहासाठी नागपूरमध्ये दोन इमारती उपलब्ध करून दिल्या जाण्याचा निर्णय झाला (पान ४ वर)

# भारत, चीनला धमकाविणाऱ्या अमेरिकेला पुतिन यांनी दिला इशारा

नवी दिल्ली दि.४ (वृत्तसंस्था)- अमेरिकेने लादलेल्या आयातशुल्कामुळे भारतातील निर्यातीवर विपरित परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रशियाकडून कच्चे तेल आयात केल्यामुळे अमेरिकेने भारताला दंडात्मक कर लावला आहे. यावरून आता रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी अमेरिकाला इशारा दिला आहे. भारत आणि चीन सारख्या देशांवर आर्थिक दबाव टाकला जाऊ शकत नाही. अशाप्रकारच्या दबावामुळे या राष्ट्रातील नेतृत्व कमकुवत होऊ शकते, असेही पुतिन म्हणाले.

शांघाय सहकार संघटनेच्या परिषदेत सहभागी झाल्यानंतर पुतिन यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, वसाहतवादाचे युग आता संपले आहे. त्यामुळे त्यांनी (अमेरिका) आता लक्षात घ्यावे की, आपल्या भागीदार राष्ट्रांशी या स्वरात बोलता येणार नाही.

तसेच रशियाचे राष्ट्राध्यक्ष (पान ४ वर)

# केंद्रात आणि राज्यात सत्ता असतानाही फडणवीसांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी काय केले? बच्चू कडूंचा सवाल

मुंबई दि.४ (प्रतिनिधी)- कुठलंही सरकार असू दे ते शेतकरी शेतमजुरांसाठी नाहीच. जो शेतकरी, कष्टकरी, कामकरी आहे, त्याच्यासाठी लढा द्यावाचं लागतो. राजकारण बाजूला ठेवायचं आहे. राजकारण जाती धर्मावर करायचं आणि व्यवस्थित समीकरण जुळवायचं, हे त्यांचं राजकारण सुरू आहे. केंद्रात आणि राज्यात सत्ता असतानाही देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी काय केलं हे त्यांनी सांगावं? मराठा, ओबीसी, दलित, मुसलमान, आदिवासी या आरक्षणाला घेऊन गावागावात वाद होता कामा नये. केंद्रात आणि राज्यात तुमची सत्ता आहे. त्यामुळे, ओबीसी आणि मराठ्यांच्या नेत्यांना बोलावं. यात कुणी कुणाचं वाईट होऊ नये कोणी कोणाचं हक्क हिसकावू नये, ही सगळी व्यवस्था निर्माण करावी, असा हल्ला प्रहार नेते बच्चू कडू यांनी भाजप सरकारवर केला.

बच्चू कडू म्हणाले की, कुठलंही सरकार असू दे ते शेतकरी शेतमजुरांसाठी नाहीच. जो शेतकरी, कष्टकरी, कामकरी आहे, त्याच्यासाठी लढा द्यावाचं लागतो. प्रत्येकाने ओबीसी, मराठा, दलित, हिंदू, मुस्लिम असं म्हणूनचं लढायचं. तसं म्हणूनच राजकारण करायचं असतं यात व्यवस्थित शेतकऱ्यांना बाजूला ठेवायचं असतं. हक्काची लढाई बाजूला ठेवायची आहे. राजकारण बाजूला ठेवायचं आहे. राजकारण जाती धर्मावर करायचं आहे. व्यवस्थित समीकरण जुळवायचं हे त्यांचं राजकारण सुरू आहे.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या भावाला हमीभाव मिळत नाही. मात्र, लगतच्या छोट्याशा छत्तीसगड राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या मालाला ३१०० प्रती क्विंटल हमीभाव मिळतोय आणि महाराष्ट्रात कमी दर मिळतो. छत्तीसगडमध्ये एका एकरात १२ ते १३ हजार रुपये दर देतो तर महाराष्ट्रात हेक्टर मागे १५००० रुपये देतो एवढी मोठी तफावत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विदर्भातील असताना सुद्धा इथं तूर, कापूस, भात उत्पादक शेतकरी मरतोय. केंद्रात आणि राज्यात सत्ता असतानाही फडणवीसांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी काय केलं हे त्यांनी सांगावं, असा म्हणत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

# युएस कोर्टात टॅरिफवरून खटला सुरू

वॉशिंग्टन दि.४ (वृत्तसंस्था)- काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील स्थानिक न्यायालयाने अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना परदेशी आयातीवर मोठ्या प्रमाणात टॅरिफ लादण्याचा अधिकार नाही, असा निर्णय दिला होता. आता या निर्णयाविरोधात डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या याचिकेत, ट्रम्प यांनी भारतावर मोठ्या प्रमाणात लादलेल्या टॅरिफचे समर्थन केले आणि म्हटले की, रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा हा एक महत्त्वाचा भाग होता.

या याचिकेत असे म्हटले आहे की, 'रशिया आणि युक्रेन यांच्यातील सुरू असलेल्या युद्धाला तोंड देण्यासाठी, याचबरोबर इतर युद्धग्रस्त देशांत शांतता प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा पैलू म्हणून, राष्ट्राध्यक्षांनी अलीकडेच रशियन ऊर्जा उत्पादने खरेदी करत असल्याबद्दल भारतावर अतिरिक्त (पान ४ वर)

# पालक व शिक्षकात समन्वय व सुसंवाद हवा

आ जचा विद्यार्थी हा कमालीचा अस्वस्थ व निरागस निराश झाल्यासारखा वाटत आहे. अभ्यासाविषयी आवड नाही, शाळा कॉलेजविषयी आस्था नाही. समाजाविषयी व सामाजिक संबंधाविषयी आपुलकी व मान मर्यादाची भावना झपाट्याने लोप पावत आहे. यामुळे आजचा विद्यार्थी भविष्यात बेशिस्त, तर होणार नाही ना? अशी सारखी भिती वाटत आहे.

आजचा शाळा महाविद्यालयाचा विद्यार्थी असज्ञ निराश-निरागस, अनास्था असलेला का आहे ? याचा आई -वडील-शिक्षक व समाजाने विचार करावयास हवा. अर्थात यास आजची झपाट्याने बदलत जाणारी भोग्य संस्कृती होय. दूरदर्शन, चित्रपट, अश्लील गाणी, चित्रपटातील अश्लील दृष्य, टी.व्ही.चे दर्जाहिन दृष्य व सिनेमा याचा युवा पिढीवर फार मोठा परिणाम झालेला आहे. तद्त्वतच तो बालमनावर ही फार मोठ्या प्रम ाणावर होत आहे. यामुळे संपूर्ण समाज या विकृतीच्या खाईकडे ओढल्या जात आहे. या परिस्थितीला वेळीच आळा घातला नाही तर आजची युवा पिढी व उद्याची बालके ही आपले संपूर्ण आयुष्य बेचिराख करून ब सतील व या देशातील समाज व्यवस्था कोलमडेल, संस्कृती विकृतीकडे झुकेल, मानमर्यादा आदरभाव पायंदळी तुडविल्या जाईल व समाजात रानटीपणा म ाजून समाजाची अवस्था जंगली प्राण्यासारखी होईल. यात तीळ मात्र शंका नाही.

या परिस्थितीला वेळीच पायबंद घालावयाचा असेल तर पालक-शिक्षक यांनी एकत्र बसून विद्यार्थ्यांच्या विविध समस्या व अडचणीवर चर्चा करून त्यावर मार्ग काढण्याची नितांत गरज आहे. पालक व शिक्षक यांच्यात विद्यार्थ्यांच्या समस्या बाब त सुसंवाद साधला गेला तर उद्या भारतीय समाजावर व भारतीय संस्कृतीवर तसेच सामाजिक मुल्यांवर येऊ पाहणारे संकट सहज थोपविता येईल व मानवी मूल्य व सांस्कृतिक मुल्यांची जपणूक केल्या जाईल.

२१ व्या शतकात आपण असतांना या स्पर्धा व विज्ञानाच्या युगात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने कठोर परिश्रम करण्याची गरज आहे. आपल्या कामावर व कर्तव्यावर श्रद्धा ठेवून आपले मन सतत विधायक व चांगल्या काम ात गुंतवून ठेवावयास हवे. मुलांच्या शैक्षणिक समस्या या असू शकतात. परंतु या समस्या पूर्ण करता येणार नाही असे काही असू शकत नाही यासाठी पालक व शिक्षक यांच्या सुसंवादातून सहज सुटू शकतात यासाठी पालक शिक्षक मेळावे भरविण्याची किंवा आयोजित करण्याची नितांत गरज आहे.

हल्लीचे पालक आपला व्यवसाय, नौकरी, उद्योगधंदे यात गूंफलेले आहेत. त्यांना पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देण्यास वेळ कुठे आहे. आजच्या पालकांची आजच्या शिक्षणाबाबत उदासिनता आहे म्हणून पाल्या बाबतही ते उदासीन राहतात. परंतु याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर प्रतिकूल असा परिणाम होत आहे. संख्या बरोबरच जेव्हा गुणवत्ता वाढते तेव्हाच खरी प्रगती झाली असे म्हणता येते. यासाठी संख्यात्मक प्रगती महत्वाची नसून ती गुणात्मक प्रगती होणे गरजेचे आहे. यासाठी विद्यार्थी अधिक कष्टाळू व शिस्तप्रिय व मानमर्यादा पाळणारा असावयास पाहिजे. शिक्षकांची भूमिका ही दिपकाची भूमिका असायला हवी. शिक्षक अतिशय निष्ठावान व उपक्रमशिल असावयास पाहिजे तर पालकही अधिक जागृत व कर्तव्यदक्ष असणे गरजेचे आहे. अध्ययन करीत असतांना विद्यार्थ्यांनी चिंतन व मननाची सवय लावून घेतली तर त्याचा आत्म विश्वास आणखी दृढ होईल यात तिळमात्र शंका नाही. शिक्षकाच्या बाबत म्हणतात की, 'जगाचा कधीकाळी विकास व्हायचा असेल तर तो शिक्षकांच्या हस्तेच होवू शकेल'. वास्तविक पाहता शिक्षकांना विद्यार्थ्यांना संस्कारक्षम करण्यासाठी फार काही वेगळे करण्याची गरज नाही. अध्ययन अध्यापनाचे कार्य करीत असतांना मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व भूगोलाच्या पाठातून विद्यार्थ्यांच्या मनावर जर शिक्षकांनी आदर्शाचे संस्कार बिंबवले तर आजचे विद्यार्थी उद्याचे या समाजाचे या देशाचे सुजाण, संस्कृत व आदर्श नागरीक घडतील, यात तीळ मात्र शंका नाही. यासाठी शिक्षकांनी वर्गातच प्रयत्न करण्याची गरज आहे. शालेय पुस्तकातील पाठातून, परिपाठातून, व विविध कार्यक्रमाच्या माध्यम ातून आदर्श व सुसंस्काराचे धडे सहज गिरविल्या जाऊन शकतात. पालकांनाही आपल्या पाल्याबाबत जागृत रहावयास हवे. त्यांच्या आवडी निवडीचा विचार करून त्यावर अभ्यासाचे ओझे लादू नये तर त्याला त्याच्या आवडीनुसार अध्ययन निवडीचे स्वातंत्र्य द्यावयास हवे. पालकांनी शाळा कॉलेजात जावून पाल्याच्या शैक्षणिक बाबीची चौकशी करावयास हवी. त्यांना वाईट सवयी व वाम मार्गापासून लांब ठेवावयास हवे. त्यांच्या वेगळ्या वाटणाऱ्या हालचालींची त्वरीत दखल घ्यावी तरच आजचा विद्यार्थी हा विधायक दृष्टीकोन धारण केलेला असू शकेल. शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. असे असतांना पालकांनी शिक्षणाबाबत उदासिन न होता आपल्या सर्व पाल्यांना पूर्ण शिक्षण द्यावे.

वाढत्या विघातक कामांना आळा घालण्यासाठी पालक व शिक्षक यांच्यात सुसंवाद होणे गरजेचे आहे. पाल्याच्या प्रत्येक बाबी बाबत पालकांनी दक्ष रहावे. व समाजोन्नती घडवून आणावी. हे काम अवघड नाही. परंतु वेळ लागणारे काम आहे. शिक्षणाचा अर्थ नौकरीशी कोणत्याही पालकाने न लावलेला ब रा. शिक्षण म्हणजे मानवाला मानव म्हणून जगण्यास सांगणारे ते एक माध्यम आहे. त्याशिवाय माणूस खरे जीवन जगू शकत नाही.

# वैभव संपन्न व्यक्तीत अग्रस्थानी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्

कोणत्याही देशाचे वैभव त्या देशांच्या उत्कृष्ट व ज्ञानसंपन्न शिक्षकांवर अवलंबून असते. ज्या देशाचे शिक्षक उच्चविद्या विभूषिता, कर्मयोगी, ज्ञानयोगी त्या राष्ट्राचे विद्यार्थी सर्वच क्षेत्रात उत्कृष्ट प्रगती करून देशाला वैभव संपन्न ब नवितात आणि म्हणून उत्कृष्ट शिक्षकांना राष्ट्रांचे वैभव म्हणतात. अशा वैभव संपन्न व्यक्तीत अग्रस्थानी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् आहेत. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् म्हणजे भारताचे थोर वैभव होय. त्यांनी पश्चिमेच्या जगाला पाश्चात्य संस्कृतीचा परिचय करून दिला आणि पाश्चात्यांच्या आधुनिकतेचा कानमंत्र त्यांनी पाश्चात्यांना शिकविला.



पूर्व-पश्चिमेचा अपूर्व संगम घडविणारा धर्म नि विज्ञानाचा नवा अर्थ त्यांनी जगाला सांगितला. भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास करून तिची महती साऱ्या जगाला पटवून देणाऱ्या या ऋषीतुल्य विभूतीने राष्टपती पदावरून भारतीय जनतेला आदर्श नेतृत्वही दिले.

जगाचे कधी काळी कल्याण व्हावयाचे तर ते शिक्षकांच्या व्दारेच होईल असे वि.स. खांडेकर यांनी सांगितले आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने सर्व विषयांचे ज्ञान प्राप्त करून संपूर्ण विश्वाला आपल्या ब द्धीमत्तेने थक्क केले. भारतीय तत्वज्ञानाचा चालता बोलता विश्वकोष म्हणजे राधाकृष्णन होत. एक शिक्षक म्हणून त्यांचे कार्य संपूर्ण विश्वाला आदर्श आहे.

तत्वज्ञ राष्ट्रपती म्हणून निवड - १९५१ साली भारताचे राष्ट्रपती म्हणून डॉ. राधाकृष्णन् यांची बिनविरोध निवड झाली. एक तत्त्वज्ञ विव्दान प्रवक्ते यशस्वी शिक्षक, लेखक, चिंतक अशा विविध नात्यांनी राधाकृष्णन् विश्व विख्यात होतेच पण उपराष्टपती म्हणून आणखी ख्यातनाम झाले. या पदावर दहा वर्षे त्यांनी यशस्वी कामगिरी केली. १३ मे १९६२ रोजी भारताचे दुसरे राष्ट्रपती म्हणून त्यांची निवड झाली. राष्ट्रपती पदावर आरूढ होताच आपल्या दहा हजार रूपयांत कपात करून त्यांनी फक्त अडीच हजार रूपये घेण्याचे घोषित केले.

शिक्षण हेच जीवन - शिक्षण हे व्यक्ती जीवनाचे उन्नती व विकासाचे प्रभावी साधन आहे. डॉ. राधाकृष्णन हे हाडाचे शिक्षक होते. शिक्षकी पेशा पत्करून त्यांनी अनेकांना ज्ञान दान केले. विद्यार्थी म्हणून शिकत असताना त्यांनी खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवून ज्ञानदान केले. त्यांनी १९०८ साली वेदांतील वेदांतातील नीतिशास्त्र या विषयावर एक प्रबंध लिहिला त्यावेळी त्यांचे वय केवळ २० वर्षे होते. ऑक्सफर्ड विद्यापीठात एक विद्यार्थी प्रिय कुशल प्राध्यापक म्हणून गाजले. त्यांच्या विव्दातेने अनेक विद्वानांना दीपविले. ऑक्सफर्डसारख्या ठिकाणी राहून त्यांनी आपली साधी राहणी टाकलेली नव्हती. विवेकानंद, टागोर आणि महात्मा गांधींचा प्रभाव - डॉ. राधाकृष्णन यांच्या आचार व विचारांवर स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर व महात्मा गांधी यांचा प्रभाव दिसून येतो १९३९ साली जागतिक लेखकांनी म हात्माजीवर लिहिलेल्या लेखांचा संग्रह त्यांनी स्वत: संपादित करून प्रसिद्ध केला आणि गांधीजींना त्यांच्या वाढदिवसानिमित्त अर्पण केला. परंपरेचा परमेश्वर करू नका, असे त्यांचे म्हणणे होते.

भारतरत्न राधाकृष्णन् - चिनी आक्रमणाने संपूर्ण देशाला धक्का बसला. नेहरू सुद्धा खचले पण राधाकृष्णन् मात्र राष्टाला धीर देण्यासाठी पुढे सरसावले. आणीबाणी जाहीर केली. भारत संरक्षण कायदा लागू केला. या थोर पुरूषाला भारतरत्न देवूनही सन्मानित करण्यात आले. अशा या थोर महापुरूषाचा जन्मा करण्यात येतो व देशातील

शिक्षकच शाळेचा खरा असे आत्मा
त्यांच्या सद्गुणांचे गुण गातात परमात्मा
विद्यार्थ्यांना प्राप्त होतो ज्ञानाचा तिसरा डोळा
शिक्षकी ज्ञानाने घडतो मातीचाही गोळा
विद्या विनयेन शोभते सांगती
शिक्षक वर्ग त्यांच्या ज्ञानरुपी
कार्याची चर्चा करतात सर्व
ज्ञान तेथे मान शिक्षकांचा सन्मान
शिक्षक घडवितात विद्यार्थी, छान, छान
शिक्षकांचे जगी असे महान थोर कार्य
त्यांच्या कार्यानेच घडतात अनेक मौर्य
शिक्षकांचा आदर व्हावा सर्वत्र
सत्कार करावा जमून सर्व एकत्र
शिक्षक दिनाच्या शुभेच्छा
शिक्षकांना देऊ या
शिक्षकांचा मान-सन्मान सर्वत्रच करू या.

**- धोंडीरामसिंह राजपुत**

उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यात येतो. एक शिक्षक उच्चपदी जावून देशासाठी महान कार्य करू शकतो हे आदर्श डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी आपल्या कर्तृत्वाने दाखवून दिले.

**- धोंडीरामसिंह राजपुत**

# आयुष्याचा दीपस्तंभ... शिक्षक..!

**तुमच्या** आमच्या जीवनात कुटुंबाचे खूप महत्व आहे. तुमची जडण घडण कुटुंबावरून ठरते आणि घराबाहेर पडल्यानंतर तुमच्यावर संस्कार घडविण्यासह ज्ञान देणारे व जीवनाला दिशा देणारे शिक्षक तितकीच महत्वाची भूमिका ठेवून असतात. आयुष्यात तुम्ही आज ज्या कोणत्या पदावर किंवा व्यवसायात आहात त्याचा पाया शिक्षकांनी घातलेला आहे हे त्रिवार सत्य आहे. स्वतः एका जागी स्थिर राहून दीपस्तंभासारखे स्थिर राहून दिपस्तंभासारखं दिशा दर्शन करणाया शिक्षकांच्या आदरासाठी व त्यांच्या कार्याचं ऋण व्यक्त करण्यासाठी असणारा दिवस म्हणजे शिक्षक दिन.



५ सप्टेंबरला आपण दरवर्षी शिक्षक दिन साजरा करतो. भारताचे दुसरे राष्ट्रपती असलेले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याबद्दल आणि एकुणच शिक्षकांच्या कार्याबद्दल असणारी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिक्षक दिन डॉ. राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी साजरा व्हावा अशी इच्छा त्यांच्याकडून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली होती.यानुसार १९६६ साली ५ सप्टेंबर हा देशातील शिक्षक दिन म्हणून घोषित करण्यात आला.

शिक्षणाचे महत्व आपण सर्व जाणतो यासाठी आपणाकडे पूर्वीच्या गुरुकुल परंपरेत गुरु पौर्णिमा दरवर्षी आपण साजरी करतो व गुरुप्रती असणारी कृतज्ञता आपण व्यक्त करतो. जागतिक स्तरावर युनेस्कोने केलेला विनंतीनुसार आंतरराष्ट्रीय शिक्षक दिन घोषित करण्यात आला मात्र ती जगभरात ५ ऑक्टोबर या दिनांकास असतो. भारतासाठी ५ सप्टेंबरचा हा शिक्षक दिन महत्वाचा.

शिक्षण हा आयुष्यात प्रगतीचा मार्ग आहे.
विद्येविना मती गेली, मनी विना निती गेली
निती विना गती गेली, गती विना वित्त गेले
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ अविद्येने
केले

भारतात स्त्री शिक्षण सुरू करणारे महात्मा जोतिबा फुले यांनी यापध्दतीने शिक्षणाचे महत्व सांगितले आहे. यासाठीच आपणास विद्यादान करणाया शिक्षकांचे महत्व आपल्या आयुष्यात अनन्य साधारण असे आहे.

आपल्याकडे सध्याची जी शालेय शिक्षण पध्दती आहे ती ब्रिटीशांनी आपल्याकडील गुरुकुल परंपरा मोडून सुरु केली आहे. आपल्या देशाला खूप मोठी सांस्कृतिक परंपरा आणि आपण शिक्षणाला आध्यात्म ाची जोड देखील होती. मात्र राष्ट्रातील ही परंपरा तुटत नाही तोवर ब्रिटिशांना भारतात स्थैर्य लाभणार नाही या भूमिकेतून सध्याची शिक्षण पध्दती ब्रिटिशांनी भारतात रुजवली.

आपण सध्या ज्या शिक्षण पध्दतीत शिक्षण घेत आहोत त्या शिक्षणाने आपल्याला फायदा झाला असला तरी आयुष्यात थेट लाभ देणारं हे शिक्षण आहे असे म्हणता येणार नाही. बदलत्या काळानुसार आपण आपल्या गुणवत्तेच्या बळावर अनेक शिखरे गाठली असे असले तरी आपणाला मुल्ये शिकता आली नाहीत कारण ती शिक्षण अभ्यासक्रमाचा भाग नाही म्हणूनच शिक्षणा सोबत संस्कार देर्णाया या शिक्षकांचे महत्व अधिक जाणवते.

आपण केवळ शिक्षण घेतो असे नाही तर आपण सोबतच अनेक बाबी शिकतो. शिक्षक आपणास वेळेचे महत्व, कामाची शिस्त, या सोबतच जगताना लागणारे व्यवहारज्ञान आदींच्या शिक्षणातून घडवतात.

एकाच वर्गात शिकणारी मुलं आयुष्यात एकाच दिशेने जात नाहीत याला ग्रहणक्षमतेम धील फरक तसेच प्रत्येकाची अभ्यासू वृत्ती आणि अंगभूत कलागुण देखील जबाबदार असतात आणि ते ओळखून वेगळी वाट स्विकारण्याचा सल्ला शिक्षक देतात म्हणून देखील या शिक्षकांचे अधिक महत्व आहे.

छडी लागे छमछम, विद्या येई घमघम असं म्हणत एक पिढी शिकली. या पिढीत प्रत्येकाने शिक्षकाचे वेगळे रुप अनुभवले आहे. आता काळानुसार सर्व पध्दती बदलल्या आणि शिक्षणातील प्रत्यक्ष शारिरीक शिक्षा हा प्रकार बाद झाला नव्या पिढीला आता मुल्यदायी आणि आनंददायी शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण मिळते परंतु मुळात त्या शिक्षकांचे ज्ञानदानासोबत असणारे संस्कारच विद्यार्थ्यांना घडवत असतात.

शिक्षणाचं आयुष्यात असणारं महत्व किती आहे हे अनेक विद्वानांनी आणि थोर समाजसुधारकांनी सांगितलं आहे मात्र अशा शिक्षणास संस्काराची जोड असणं आवश्यक असतं म्हणूनच म्हणतात.

विद्या विनयेन शोभते. हा विनय आणि जगण्याचं भान देर्णाया सर्व शिक्षकांना या निमि त्त सादर वंदन. शुभ शिक्षकदिन

**- प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

# हरिपाळदेव हेच सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी!

**(सप्टेंबर : चक्रधर स्वामी जन्मोत्सव / जयंती उत्सव.)**

मजसे कृता-त्रेतायुगात श्री दत्तात्रेय आणि द्वापारयुगामध्ये श्रीकृष्ण हे परमेश्वर अवतार झाले, तसे कलियुगात श्री चक्रधर स्वामी हे बाराव्या शतकातील परमेश्वर अवतार आहेत. ते महानुभाव पंथाचे संस्थापक आहेत. ते महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानानुसार ईश्वराच्या पंचावतारांपैकी पाचवा अवतार आहेत. लीळाचरित्र या मराठीतील पहिला चरित्रग्रंथ लीळाचरित्र याचे केंद्रबिंदू श्री चक्रधर स्वामीच आहेत. इतिहासात त्यांना म हत्त्वाचे स्थान आहे. वैदिक परंपरेला नाकारून स्त्री-शूद्रांसह सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणाऱ्या सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे नाव म हाराष्ट्रातील समाजसुधारकांमध्ये अग्रक्रमाने घ्यावे लागेल. भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींच्या भक्तीच्या प्रेरणेतून जे साहित्य त्यांच्या भक्त व अनुयायांकडून निर्माण झाले. त्यामुळे मराठी साहित्यपरंपरेची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. आणखी वाचा कृगोनि- कृ. गो. निकोडे गुरूजींच्या या लेखात... संपादक.म



भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रारंभिक जीवनासंबंधी माहिती लीळाचरित्राच्या एकांक या भागात मिळते. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजराथमधील भडोच येथे दि.४ सप्टेंबर १२२१ अर्थात शके ११४२, भाद्रपद महिन्याच्या शुक्लपक्षाच्या रविवारी सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचा अवतार झाला. त्यांचे वडील विशाळदेव हे भडोचचा राजा मल्लदेव यांचे प्रधान होते. त्यांच्या आईचे नाव माल्हणदेवी- माल्हाईसा होते. सर्वज्ञ श्रीचक्रधरांचे जन्म नाव हरिपाळदेव असे होते. तारुण्यात आल्यावर हरिपाळदेव यांचा विवाह कमळादेवी- कमळाईसा यांच्याबरोबर झाला. याच काळात त्यांनी युद्धांतही पराक्रम गाजवला. पुढे हरिपाळदेवांना आजारी लोकांची सेवा करायचा छंद लागला. बरेचदा ते राजवाडा सोडून आजारी लोकांबरोबर वेळ घालवू लागले. पुढे त्यांची प्रकृती अचानक खालावली व त्यांचा मृत्यू झाला. परंतु स्मशानात सरणावर ठेवल्यावर हरिपाळदेव जिवंत असल्याचे आढळून आले. महानुभावीयांच्या श्रद्धेनुसार यावेळी श्रीकृष्णाने त्यांच्या शरीरात प्रवेश करून अवतार धारण केला. पंचावतारातील तिसरा अवतार श्रीचांगदेव राऊळ यांचा त्याच सुमारास मृत्यू झाला होता. काही मतांनुसार त्यांच्या आत्म्याने हरिपाळदेवांच्या शरीरात प्रवेश केला. हरिपाळदेवांच्या शरीरात प्रविष्ट होणारा आत्मा स्वतंत्र ईश्वरी आत्मा होता. ही अवतारधारणाची घटना शक संवत्सर ११४२ भाद्रपद महिन्याच्या शुक्लपक्षाच्या रविवारी घडली. या घटनेनंतर चक्रधरांचे आयुष्य पूर्वीप्रमाणेच सुरू झाले. कालौघात त्यांना एक पुत्रही झाला. त्यांचे आजारी लोकांना सेवा देणे मात्र तसेच सुरू राहिले. एक दिवस काही रुग्णांना फारच खर्च लागल्यामुळे त्यांना उसने घ्यावे लागले. त्यांनी देणेकऱ्यांचे पैसे जोपर्यंत देणार नाही तोपर्यंत अन्नप्राशन करणार नाही, अशी शपथ घेतली. त्यांच्या पत्नीने त्यांना या कारणासाठी दागिने देण्यास नकार दिला. शेवटी त्यांच्या वडिलांनी त्यांच्या नकळत देणेकऱ्याचे पैसे परत केले. या घटनेमुळे हरिपाळदेव यांना औदासीन्याने ग्रासले. लौकिक प्रपंचातून त्यांचे मन उडाले. त्यांनी राजविलासी भोग, संसार-सुख यांचा त्याग करून लोकसेवा करण्याचा निर्णय घेतला.

गृहत्याग करण्यासाठी हरिपाळदेवांनी रामाच्या दर्शनास रामटेक येथे जावयाचे आहे, अशी सबब घरी सांगितली. त्यावेळी महाराष्ट्रातील यादव व भडोचचे राज्य यांच्यात कलह सुरू होता. त्यामुळे त्यांच्या वडिलांनी या कल्पनेस विरोध केला. परंतु शेवटी हरिपाळदेवांनी वडिलांचे मन वळिवले व त्यांच्या वडिलांनी त्यांना संरक्षणासाठी घोडेस्वार व सेवक यांच्यासह जाण्यास अनुमती दिली. त्यांना आपल्यासोबतचा लवाजमा नको होता. त्यांना सर्वस्व त्याग करावयाचा होता. त्यामुळे त्यांनी एकेका मुक्कामावरून आपले क्षेमकुशल कळवण्यासाठी एकेक सैनिक परत पाठवणे सुरू केले. शेवटी अमरावती जिल्ह्यातील देऊळवाडा येथे काजळेश्वराच्या मंदिरात मुक्कामास असतांना त्यांचे सैनिक निद्राधीन झाल्याचे पाहून आपली राजवस्त्रे तिथेच काढून ठेवून दोन वस्त्रांनिशी ते तिथून निघून गेले. सर्वस्वाचा त्याग करून भ्रमण करत असतांना हरिपाळदेव ऋद्धिपूर येथे आले. तिथे त्यांना विरक्त अवस्थेतील श्री गोविंदप्रभू दिसले. श्री गोविंदप्रभूंपासून हरिपाळदेव यांना शक्ती प्राप्त झाल्या. याचवेळी गोविंदप्रभूंनी त्यांना चक्रधर हे नाव दिले. श्री गोविंदप्रभूंपासून शक्ती मिळाल्यानंतर श्री चक्रधरांची विरक्ती अधिकच वाढू लागली. लीळाचरित्राच्या एकांक या भागात त्यांच्या या काळातील भ्रमंतीचे वर्णन आहे. अहम दनगर जिल्ह्यातील पाथर्डीपासून आठरा कि.मी. अंतरावरील येळी या गावी आले. 'लीळाचरित्र' या मराठी भाषेतील पहिल्या चरित्रग्रंथात काही काळ ते येळी या ठिकाणी वास्तव्यास आल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. येळी या ठिकाणी नदी किनारी महानुभाव पंथीय मंदीर आहे. या काळात त्यांनी महाराष्ट्रभर एकट्यानेच भटकंती केली. आंध्र प्रदेशाच्या काही भागातही त्यांनी भ्रमण केले. यावेळेपर्यंत त्यांना फारसा शिष्यपरिवार लाभला नव्हता. एकाप्रसंगी तर ते गाईच्या गोठ्यात जाऊन झोपले. एकाप्रसंगी वरंगळ येथील एका घोड्याच्या व्यापाऱ्याने आपल्या हंसांबा नामक मुलीचे श्री चक्रधरांसोबत लग्नही लावून दिले. तिथे काही दिवस राहून ते परत संन्यस्त झाले. गोंडवनातील आदिवासींच्या सहवासातही ते काही दिवस राहिले. या काळात त्यांना तुरळक शिष्य लाभले, त्यांपैकी वडनेरचे रामदेव दादोस हे प्रमुख होते. त्यांच्यामार्फतच पुढे श्री चक्रधरांना नागदेव, आबाइसा, म हादाइसा, उमाइसा इत्यादी शिष्यपरिवार मि ळाला. या भ्रमंतीच्या काळात त्यांची मेहकर येथे बाणेश्वराच्या मंदिरात बोणेबाईची भेट झाली. बोणेबाईना देवकी व स्वतः श्रीकृष्ण बनवून त्यांनी मेहकर येथे गोकुळाष्टमी साजरी केली. बोणेबाईबरोबर त्यांनी लोणारची यात्राही केली. नंतर एके दिवशी सिंहस्थ यात्रेच्या निमित्ताने ते बोणेबाईबरोबर त्र्यंबकेश्वरला जाण्यास निघाले. वाटेत पैठण येथे त्यांनी त्र्यंबकेश्वरास जाण्याचा बेत रद्द करून पैठण येथेच विधिवत संन्यासाची दीक्षा घेतली. ही घटना शके ११८९ मध्ये घडली. अशा तऱ्हेने ऋद्धिपुरापासून सुरू झालेले श्री चक्रधरांचे एकाकी भ्रमण पैठण येथे संपले. यानंतरच्या काळात त्यांनी प्रकटपणे समाज व धर्मसुधारणेचे त्यांचे कार्य सुरू केले. एकाकी भ्रमणाच्या काळात त्यांनी लोकजीवन प्रत्यक्ष पाहिले. त्या काळातील सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे अवलोकन केले. त्यांच्या पुढील ज्ञानदानाच्या कार्याची पूर्वतयारीच या काळात झाली. त्यांनी आपले अवतार कार्य उरकून दि.७ फेब्रुवारी १२७४ रोजी नश्वर देहाचा त्याग केला आणि विशाल अनंतात विलीन झाले.

**!! जयंतीच्या पावन पर्वावर त्यांना कोटी कोटी दंडवत प्रणाम !!**

**कृगोनि- श्री कृ. गो. निकोडे गुरूजी.**
पोटेगांवरोड, गडचिरोली,

## श्री गणेशाच्या कविता

### बाप्पा आले

बाप्पा आले बाप्पा आले बालगोपाल खूप आनंदले
वाजत-गाजत बाप्पा विराजले मोदक-खिरापत मिळू लागले
बाप्पाच्या भोवती बाल -गोपाल खिरापत-मोदक माला माल
बाप्पा गातात सर्व आरती मिळून सारे सखा सोबती
गणपती बाप्पा मोरया मोदक लाडू खाऊ या
गणपती उत्सव लई भारी आनंद घेतात सारी--सारी

### बाप्पाची खिरापत

बापाच्या खिरापतिची अवीट गोडी सर्वांना मिळते थोडी--थोडी
बाप्पाची खिरापत खूप, खूप गोड दहा दिवस असते बाप्पाची ओढ
खिरापतिचा आनंद भक्त लुटतात बाप्पाची सेवा करीत असतात
बापाच्या ज्ञानाची कीर्ती सारी,सारी ऐकून थक्क होतात
नर आणि नारी खिरापत वाटू मोदक वाटु सुख शांतीचे शिखर गाठू
आमचे बाप्पा जगी महान गुण गाती मोठे लहान
- धोंडीरामसिंह राजपूत

### आरती बाप्पाची

गणपती बाप्पांची गाऊ आरती मिळून सारे सखा सोबती
गणपती बाप्पा गणपती बाप्पा दहा दिवस आता तुमच्याच गप्पा
मोदक-खिरापत तुमची गोड तुमच्या आरतीची आम्हा ओढ
गाऊन तुमची रोज आरती आम्हा मिळते भारी स्फूर्ती
गणपती बाप्पा ज्ञानमूर्ती जगी तुमची भारी किर्ती

### टाटा बाप्पा

करतो बाप्पा तुम्हा टाटा दहा दिवस सेवेचा वाटा
बाप्पा तुमचा उत्सव न्यारा आम्हा आवडला
सारा-सारा बाप्पा तुमची किर्ती मोठी आरती तुमची आमच्या ओठी
निरोप बाप्पा आता घ्यावा पुढच्या वर्षी लवकर यावा
टाटा!टाटा!! गणपती बाप्पा पुढल्या वर्षी खूप, खूप,गप्पा
गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या......

### बाप्पांना निरोप देताना

बाप्पांना निरोप देतांना सेवेची ठेवा आठवण
बाप्पांच्या सदगुणांची मनी करावी साठवण
बाप्पाच्या सेवेचा होता दहा दिवस ध्यास
बाप्पांची सेवा मनी भावली खास
मोदक, खिरापतचा गोड,गोड गोडवा
बुध्दीदाता बनून समस्या सर्व सोडवा
बाप्पांना निरोप देतांना ध्यानी,मनी ठेवा
निस्वार्थ सेवेचा सर्वांना मिळे मेवा
बाप्पा चुकले -बिकले माफी असावी आम्हा
पुढच्या वर्षी येण्याची विनंती असे तुम्हा

**-धोंडीरामसिंह राजपूत**

## श्री. गणेशोत्सवातून सामाजिक विधायक कार्याची पेरणी

श्री. गणेशोत्सव म्हणजे भारतीय संस्कृती ला मिळालेला अनमोल ठेवा होय.या उत्सवातून अनेक सामाजिक बाबींची उजळणी होऊन समाजाला व समाजातील लहान -थोर याना एक प्रकारे विधायक, रचनात्मक कार्याची दिशा मिळते. गणेशोत्सव सामूहिक रित्या साजरा केला जातो.विविध गणेश मंडळ पदाधिकारी या माध्यमातून एकत्र येतात,गणपती बाप्पाची मनोभावे सेवा करतात,व बाप्पांच्या विधायक कार्याची उजळणी करतात यामुळे या उत्सवातून सेवा करणाऱ्या सर्व लहान-थोर भक्तांना एक प्रकारे आपल्या सामाजिक बांधिलकीच्या कार्याची जाणीव होते,व ते या उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम आयोजित करून सामाजीक बांधिलकी जपतात.गणपती बाप्पा सुखकर्ते असून दु:ख हरते आहेत,गणपती बाप्पा बुद्धी दाता आहेत,गणपती बाप्पा आई बाबांचे अज्ञाधारक सुपुत्र आहेत,अन्याय विरुद्ध संघर्ष करणारे आहेत,विघ्नहरते आहेत.या सर्व बाबी भक्तांच्या मनावर दहा दिवस विविध मार्गातून जसे दररोजची आरती,बाप्पा च्या श्री गणपती अथर्वशीर्ष पठणातून व बाप्पाच्या विविध कार्य कर्तृत्वातून दिसून येतात.घरी जरी बाप्पा विराजमान असतील तरी घरी सकाळ-संध्याकाळ होणाऱ्या बाप्पाच्या आरतीतून बाल मनावर व कुटुंबातील सदस्यांच्या मनावर विधायक संस्कार होतातच यातून सुसंस्कार ही अनुभवता येतात .गणेश उत्सवातील ह्या सर्व बाबी सामाजिक व विधायक सकारात्मक कार्यास सहाय्यभूतच होत.श्री गणेशोत्सव काळात होणारे विविध समाजोपयोगी, राष्ट्रउपयोगी,शिक्षण उपयोगी,पर्यावरण पोषक,स्वच्छता ,व सामाजिक संबंध दृढ उपयोगी कार्यक्रम यावरून असे म्हणता येईल की.'श्री गणेशोत्सव म्हणजे सामाजिक ,विधायक व रचनात्मक कार्याची पेरणीच होय.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

## सामाजिक एकोपा विसर्जन मिरवणुकीसाठी ईद मिरवणूक दोन दिवस पुढे

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - गणेश विसर्जन मिरवणूक आणि ईद-ए-मिलाद हे दोन मोठे उत्सव सलग आल्याने प्रशासनावर ताण येऊ नये, यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शुक्रवारी (५ सप्टेंबर) होणारी ईद आता सोमवारी (८ सप्टेंबर) साजरी केली जाणार आहे. तसेच शहरात फक्त एकाच ठिकाणी मिरवणूक काढण्याची परवानगी देण्यात आली असून, इतरत्र मिरवणुकीस परवानगी नसेल.



बुधवारी (३ सप्टेंबर) पोलीस आयुक्तालयात झालेल्या शांतता समितीच्या बैठकीस पोलिस आयुक्त प्रवीण पवार, उपायुक्त रत्नाकर नवले, पंकज अतुलकर, गजानन बारवाल, डॉ. मूर्तजा, आदिल मदने, प्रशांत स्वामी आदी उपस्थित होते.

उपायुक्त नवले म्हणाले, ङ्गगेल्या काही वर्षांत गाण्यांवरून वाद निर्माण झाले आहेत. यंदा कुठल्याही प्रकारची वादग्रस्त गाणी, घोषणाबाजी टाळावी. शांतता तुमच्या सहकार्यानेच राखली जाईल.ङ्ग तर उपायुक्त अतुलकर यांनी सर्वांनी शांततेत सण-उत्सव साजरे करून आदर्श निर्माण करण्याचे आवाहन केले. मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी डॉ. मूर्तजा म्हणाले, आमच्या जुलूसमध्ये डीजे किंवा घोषणाबाजी नसते. त्यामुळे तणाव निर्माण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शहरातले सर्व उत्सव नेहमीच शांततेत पार पडतात.

**भव्यतेला एकोप्याची जोड द्या - प्रवीण पवार**

पोलीस आयुक्त प्रवीण पवार म्हणाले, माझ्या कारकिर्दीत ईदची अशी भव्य मिरवणूक याच शहरात पाहिली.

आता तीच मिरवणूक आदर्श ठरेल अशी अपेक्षा आहे. मुस्लिम समाजाने तारीख पुढे ढकलून दाखवलेला एकोपाही कौतुकास्पद आहे. यंदा आम्ही डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करीत आहोत. गेल्या वर्षी ईदच्या मिरवणुकीत बंदुकीने फटाके फोडण्यात आले होते. यंदा अशा प्रकारास पूर्ण बंदी आहे. सर्वांनी शांततेत आणि शिस्तीत उत्सव साजरा करावा.

## २२ सप्टेंबरपासून जीएसटी मध्ये मोठे बदल, काय होणार स्वस्त आणि काय महाग?

नवी दिल्ली, दि. ४ (वृत्तसंस्था) - २२ सप्टेंबरपासून केंद्र सरकारच्या नव्या जीएसटी दरांमुळे दैनंदिन वापरातील वस्तूंपासून वाहनांपर्यंत आणि आरोग्यसेवा क्षेत्रापर्यंत अनेक बदल होणार आहेत. काही वस्तूंवरचा कर कमी करून दिलासा देण्यात आला आहे, तर काही चैनीच्या वस्तूंवर कर वाढवून मोठा फटका बसणार आहे.

**दैनंदिन वापरातील वस्तू स्वस्त**



हेअर ऑईल, शॅम्पूवरील GST १८%
टूथपेस्ट, ब्रश, साबण, शेव्हिंग क्रीम ५%
दूध, पनीर, ब्रेडवरील GST हटवला
बटर, तूप, चीज, डेअरी स्प्रेड, भांडी १२%
बाळांचे डायपर, दुधाच्या बॉटल्स,
शिलाई मशीन व त्याचे भाग ५%

**आरोग्य सेवेला दिलासा**

आयुष्य वाचवणाऱ्या औषधांवरील GST हटवला
लाईफ व हेल्थ इन्शुरन्स पॉलिसींवरून GST हटवला
थर्मामीटरवरील GST १८% वरून ५%
वैद्यकीय ऑक्सिजन १२%
तपासणीच्या किट्स, चष्मे - ऋडढ ५%

**शेतकऱ्यांना फायदा**

ट्रॅक्टर, टायर व पार्ट्सवर GST १२% वरून ५%, ठिंबक सिंचनाचे भाग, स्प्रिंकलर्स, कीटकनाशकांवर सवलत

**वाहनं स्वस्त**

मिडल क्लासच्या गाड्या :
पेट्रोल, LPG, CNG आणि हायब्रिड
(1200cc, 4000mm लांबीपर्यंत) : 28%, 18%
डिझेल गाड्या (1500cc, 4000mmपर्यंत) : 28%, 18%
तीनचाकी, 350cc पर्यंतच्या बाईक, छोटी मालवाहू वाहनं : १८%

**घरगुती उपकरणं** - एअर कंडिशनर,
३२ इंचांपेक्षा मोठे टीव्ही : १८%
मॉनिटर, प्रोजेक्टर, डिश वॉशिंग मशीन : कमी ऋडढ

**शालेय साहित्य स्वस्त** - नकाशे, चार्ट्स, पेन्सिल, क्रेयॉन्स, शार्पनर, लिहायच्या वह्यांवरील GST हटवला
खोडरबर १८%, ५%

**इतर वस्तू-** सिमेंट २८%
हँडिक्राफ्ट, चामड्याच्या वस्तू : कमी GST
कचरा व्यवस्थापन सेवा १८%, ५%

**महाग होणार चैनीच्या वस्तू**

तंबाखू, गुटखा, सिगारेट, पान मसाला, साखरयुक्त ड्रिंक्स
लक्झरी गाड्या (1500cc पेक्षा जास्त डिझेल, 1200cc पेक्षा जास्त पेट्रोल इंजिन),
या वस्तूंवर GST आता ४०%

म्हणजेच, सामान्य ग्राहक, शेतकरी आणि रुग्ण यांना दिलासा; पण चैनीच्या वस्तूंवर मोठा फटका बसणार आहे.

## मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघातर्फे राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन

नाशिक, दि. ४ (प्रतिनिधी) - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाच्या पाचवा वर्धापन दिन येत्या दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी आहे. त्या निमित्ताने या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांसाठी असून त्यासाठी कमाल शब्दमर्यादा एक हजार आहे. स्पर्धेसाठी निबंध पाठविण्याची अंतिम मुदत ही येत्या दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत आहे.

निबंध लेखन स्पर्धेसाठीचे विषय हे १) मुक्त विद्यापीठामुळे शिक्षणाच्या खुल्या झालेल्या संधी २) मुक्त विद्यापीठातून घेतलेल्या शिक्षणाची माझ्या दैनंदिन जीवनातील उपयुक्तता ३) 'ज्ञानगंगा घरोघरी' नेणारे मुक्त विद्यापीठ ४) मुक्त विद्यापीठातून प्रौढांच्या शिक्षणाची स्वप्नपूर्ती ५) महिलांच्या सबलीकरणात मुक्त विद्यापीठाचे स्थान ६) मुक्त व दूरस्थ शिक्षणामधील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर (ए.आय) असे एकूण सहा आहेत. स्पर्धेसाठी केवळ मराठी भाषेतून लिहिलेले निबंधच स्वीकारले जातील. निबंधासोबत माजी विद्यार्थ्याचे नाव, पूर्ण केलेला शिक्षणक्रम, वर्ष, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी यांचा उल्लेख व निबंधाच्या खाली विद्यार्थ्याची सही असणे बंधनकारक आहे. स्पर्धेसाठीचा निबंध हा 'मा. अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक, पिन - ४२२२२२ या पत्त्यावर बंद पाकिटातून टपालाने अथवा alumniycmou@ycmou.ac.in या ईमेल आयडीवर १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत.

या स्पर्धेतील विजेत्यांना विशेष समारंभात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक म्हणून अनुक्रमे रुपये ३०००/-, रुपये २०००/- व रुपये १०००/- आणि उत्तेजनार्थ २ पारितोषिके रुपये ५००/- प्रत्येकीसह सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येईल. तसेच माजी विद्यार्थी संघाच्या वतीने निवडक निबंधांचे ई-बुक प्रकाशित केले जाईल.

निबंध लेखनासाठी वयाचे बंधन नाही. या स्पर्धेत राज्यातील जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव तथा अध्यक्ष दिलीप भरड व माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांनी केले आहे.

## जीएसटी कपात होताच ऑटो व एफएमसीजी कंज्यूमर ड्युरेबल्स शेअर्समध्ये मागणीचा पाऊस

**जीएसटी** २.० कपातीच्या घोषणेनंतर आज शेअर बाजारात मोठ्या प्रमाणात ऑटो व एफएमसीजी कंज्यूमर ड्युरेबल्स शेअर्समध्ये वाढ झाली आहे. सकाळी ऑटो शेअर्समध्ये एम अँड एम, टाटा मोटर्स, मारूती सुझुकी, टीव्हीएस मोटर्स, आयशर मोटर्स, हिरो मोटोकॉर्प अशा महत्वाच्या हेवीवेट शेअर्समध्ये वाढ झाली असून एफएमसीजी शेअर्समध्ये आयटीसी, हिंदुस्थान युनिलिव्हर, डाबर अशा शेअर्समध्ये मोठी वाढ झाली आहे. केंद्र सरकारने ऑटोमोबाईल क्षेत्रातील सामान्य श्रेणीतील (दोनचाकी, चारचा की, तीनचाकी, व्यवसायिक वाहने) यांच्या उत्पादनात २८% वरुन १८% कर लावण्याचा निर्णय सरकारने घेतल्याने या क्षेत्रातील मागणीत वाढ होऊ शकते परिणामी आज गुंतवणूकदारांनी या शेअर्समध्ये विश्वास व्यक्त करत आपली गुंतवणूक वाढवल्या मुळे आज शेअर मोठ्या प्रमाणात वाढले. कंज्यूमर ड्युरेबल्स व एफएमसीजी (Fast Moving Consumers Goods FMCG) उत्पादनात १२ व १८% स्लॅबवरून ५% कर लावण्याचा निर्णय घेतल्याने या शेअर्समध्ये मोठी वाढ झाली आहे. आगामी सणासुदीच्या काळात मो ठ्या प्रमाणात या वस्तूंच्या उपभोगात वाढ अपेक्षित आहे. सकाळच्या सत्रात ऑटो निर्देशांक ३% हून अधिक पातळीवर उसळला असून एफएमसीजी (१%), कंज्यूमर ड्युरेबल्स (०.५४%) पर्यंत उसळला होता.

याशिवाय केंद्र सरकारने निर्यातक्षम वस्तूंवरही आगामी काळात प्रोत्साहन देण्याची शक्यता आहे. एक्सपोर्ट प्रमोशन काऊन्सिलद्वारे युएसमध्ये वाढलेल्या निर्यातीतील टॅरिफचा फटका बसल्याने व्यापारांना दिलासा मिळू शकतो ज्यामध्ये त्यांच्या ड्युटीतही घसरण होण्याची शक्यता आहे.माहितीनुसार,सुधारित करप्रणाली रचनेनुसार,चार मीटरपेक्षा कमी लांबीच्या लहान गाड्या व पेट्रोल इंजिन १२०० सीसीपर्यंत मर्यादा असलेल्या गाड्या व आहे डिझेल इंजिनबाबतीत १५०० सीसी पर्यंत आहे ज्यावर आता १८% जीएसटी आका रला जाणार आहे जो पूर्वीच्या २८% वरून ३१% केला गेला होता. चार मीटरपेक्षा जास्त उंचीच्या मोठ्या एसयूव्हींवर ४०% कर आकारला जाईल, जो पूर्वीच्या ४३% वरुन ५०% केला गेला आहे. सवलतीच्या ५% जीएसटी दराचा फायदा इलेक्ट्रिक वाहनांना लागू के ला जाईल. इलेक्ट्रिक वाहनावरील सेस (Cess) रद्द करण्यात आला आहे ज्यामुळे या गाड्या स्वस्त होणार आहेत. ३५० सीसी पेक्षा कमी इंजिन क्षमता असलेल्या दुचाकी वाहनांवर आता १८% कर आकारला जाईल, जो २८ टक्क्यांवरून कमी झाला आहे. ३५० सीसी पेक्षा जास्त क्षमतेच्या दुचाकींवर ४०% जीएसटी आकारला जाईल. तसेच, ट्रक, बस आणि रुग्णवाहिका यासार ख्या व्यावसायिक वाहनांवर २८ टक्क्यांवरून १८% जीएसटी आकारला जाईल. ट्रॅक्टर आणि कृषी यंत्रसामग्रीवरील कर १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केला जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना ही आवश्यक साधने अधिक परवडतील आणि ग्रामीण मागणी वाढेल अशी अपेक्षा आहे.दुपारी १ वाजेपर्यंत महिंद्रा अँड महिंद्रा (६.१३%), टीव्हीएस मोटर्स (१.५५%),टाटा मोटर्स (०.१८%), मारूती सुझुकी (-१.२३%), हिरो मोटोकॉर्प (०.७३%), आयशर मोटर्स (१.५२%) समभागात वाढ झाली आहे. दुपारी १ वाजेपर्यंत एफएमसीजी शेअर्सपैकी आयटीसी (१.२८%), एचयुएल (०.८०%), ब्रिटानिया इंडस्ट्रीज (२.९०%), डाबर (२.१५%), मारिको (०.६७%), नेस्ले इंडिया (१.७२%) समभागात मोठी वाढ झाली आहे.

## मनपा विद्यार्थी खेळले अंतरराष्ट्रीय हॉकी टर्फवर



छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी) - महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'आम्हाला खेळू द्या' या उपक्रम ंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शासनाचे शालेय मनपा हद्दीतील जिल्हास्तरीय नेहरू हॉकी क्रीडा स्पर्धेत मनपा केंद्रीय शाळा किराडपुरा नं.१ ऊर्दू शाळेतील १५ वर्षाआतील मुले व १७ वर्षाआतील मुली या संघानी सहभाग घेतला आहे.

जी.श्रीकांत यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेने आपल्या महानगरपालिकेचे विद्यार्थी आज आंतरराष्ट्रीय हॉकी खेळपट्टीवर खेळले. आपल्या महानगरपालिकेचे विद्यार्थ्यांनी कधी हे आंतरराष्ट्रीय खेळपट्टी बघितली सुद्धा नव्हती. आज त्यांनी या आंतरराष्ट्रीय हॉकी खेळपट्टीवर खेळण्याची संधी त्यांना मिळाली.

हि स्पर्धा Sorts Authority of India, National Centre of Excellence, Chhatraati Sambhajinagar या ठिकाणी सुरू आहे. केंद्रीय मुख्याध्यापिका श्रीमती रईसा बेगम यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा प्रशिक्षक शेख आखेब जावेद हे परिश्रम घेत आहे.

## जळगावसह छत्रपती संभाजीनगरच्या विद्यापीठाशी मुक्त विद्यापीठाचा त्रिपक्षीय सामंजस्य करार

**राष्ट्रीय** शैक्षणिक धोरणांतर्गत एकाचवेळी दोन अभ्यासक्रम शिकण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्याकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने जळगावचे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्यासमवेत त्रिपक्षीय सामंजस्य करार केला आहे. जळगाव येथे दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या एका विशेष बैठकीत तीनही विद्यापीठांच्या वतीने यासंबंधीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० (एनईपी - २०२०) अंमलबजावणी मध्ये एक महत्वाचे पाऊल पुढे टाकण्यात आले आहे.





यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजय सोनवणे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. विलास सपकाळ, य. च. म. मुक्त विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिह बिसेन, क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. य. च. म. मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील व एम. जी. एम. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाने तयार केलेले यासंदर्भातील माहितीपत्रकाचे प्रकाशन मा. कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांच्या हस्ते तर विद्यार्थ्यांकरिता अतिशय उपयुक्त अशा 'पोर्टल फॉर टू डिग्री प्रोग्राम सायमंटेनिअसली' या संकेतस्थळाचे उद्घाटन मा. कुलगुरू प्रा. संजय सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. हे पोर्टल क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ ु.र्पी.रल.ळप यावर उपलब्ध आहे. या करारामुळे तिघा विद्यापीठांच्या लाखो विद्यार्थ्यांना नियमित पदवीचे शिक्षण घेतांना शेती व आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन तंत्रज्ञान, औषधीशास्त्र, या सारखे अनेक नवनवीन अभ्यासक्रम शिकता येणार आहेत. विद्यार्थ्यांना यासोबतच नाविन्यपूर्ण शैक्षणिक व अध्ययन संधी, नोकरी - करीअरच्या विस्तृत संधी आणि व्यापक पर्यायाची उपलब्धतता, व्यक्तिमत्व विकास असे विविधांगी फायदे होणार आहेत. याप्रसंगी बोलतांना मा. कुलगुरु प्रा. संजय सोनवणे यांनी सांगितले की सन २०४७ मधील विकसित भारत या अनुषंगाने नवे शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. त्यादृष्टीने आजचा करार हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. विद्यापीठांनी एकमेकांसोबत सहकार्य व संयुक्तपणे काम करून विकसित राष्ट्र घडविणे आवश्यक आहे, असे सांगून आपल्या विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. मा. कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांनी बोलताना आगामी काळ हा विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्यांना शिक्षण घेण्यासाठी विद्यापीठांनी तसे अभ्यासक्रम तयार करून देण्याचा असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने या करारामुळे त्यामुळे विद्यार्थ्यांची गरज पूर्ण होणार आहे, असे सांगत आपल्या विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती दिली. मा. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी काळाची गरज लक्षात घेता विद्यार्थ्यांनी रोजगार उपलब्धतेसाठी किमान एक कौशल्य अभ्यासक्रम शिकणे व विद्यापीठांनी आंतर विद्याशाखीय शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. त्या अनुषंगाने दोन नियमित अभ्यासक्रम तासिकांचे वेळापत्रक सकाळ / सायंकाळ अशा सत्रात ठेवून किंवा एक नियमित अभ्यासक्रम आणि एक दूरस्थ अभ्यासक्रम अशी सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे. त्यात क.ब.चौ.उ.म विद्यापीठ हे अग्रस्थानी असल्याची पुस्ती त्यांनी जोडली. याप्रसंगी य. च. म. मुक्त विद्यापीठाचे परीक्षानियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्र (सी.आय.क्यू.ए. - सिका) संचालक प्रा. मधुकर शेवाळे, प्रा. हेमंत राजगुरू, एमजीएम विद्यापीठातर्फे आय क्यू. ए. सी. संचालक प्रा. परमिंदर कौर, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. मधुलिका सोनवणे, प्रा. आशुतोष पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क.ब.चौ.उ.म विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी केले. सूत्रसंचलन कुलसचिव डॉ. विनोद पाटील तर आभार आय. क्यू. ए. सी. संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी मानले.

**-महेंद्र बनसोडे,**
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क कक्ष,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ऊर्जा परिवर्तनामुळे विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील 'रोल मॉडेल'

## परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्राचे कौतुक

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- पारंपरिक कोळसा, नैसर्गिक वायू व तेलावर आधारित विजेऐवजी महाराष्ट्राने सौर ऊर्जेला अधिक प्राधान्य देत ऊर्जा परिवर्तनामध्ये देशात सर्वप्रथम आघाडी घेतली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा दिसून येत आहे. या ऊर्जा परिवर्तनासाठी देशाच्या विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे रोल मॉडेल आहे, असे गौरवोद्गार भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांनी गुरुवारी काढले.

महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्र व विविध सौर ऊर्जा योजनांची माहिती घेण्यासाठी भारतीय परराष्ट्र सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई येथील महावितरण व महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयास भेट दिली. यामध्ये योजना पटेल (न्यूयॉर्क), प्रतिभा पारकर राजाराम, पारमिता त्रिपाठी, अन्कन बॅनर्जी, सी. सुगंध राजाराम तसेच बिश्वदीप डे (टान्झानिया), स्मिता पंत (ताश्कंद) यांचा समावेश होता. यावेळी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी. यांची प्रमुख उपस्थिती होती.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा विभागाने राज्यातील विजेची वाढती मागणी व पुरवठ्याच्या नियोजनासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यामध्ये सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. यासह पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. त्यामुळे येत्या पाच वर्षांत सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होत जाणार आहे.

सोबतच हरित ऊर्जेला प्राधान्य दिल्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे (सीओटू) उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाला बळ मिळेल.



श्री. लोकेश चंद्र म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० अंतर्गत कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे सन २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे.

जगातील ही सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. या योजनेमुळे राज्यात ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून ग्रामीण भागात सुमारे ७० हजार रोजगार संधी उपलब्ध होत आहेत.

या योजनेमुळे देशामध्ये सर्वाधिक असलेल्या महाराष्ट्रातील ४५ लाख कृषिपंपांना दिवसा व शाश्वत वीजपुरवठा होणार आहे. आतापर्यंत कार्यान्वित झालेल्या १९७२ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांमधून ३६९ उपकेंद्रांद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यात येत आहे. सोबतच क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक वीज दरात घट होण्यास सुरवात झाली आहे, अशी माहिती अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिली.

या बैठकीमध्ये महावितरणचे संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), महापारेषणचे संचालक श्री. सतीश चव्हाण (संचालन), महानिर्मितीचे संचालक श्री. अभय हरणे (प्रकल्प) तसेच कार्यकारी संचालक श्री. दिनेश अग्रवाल, श्री. किशोर पाटील, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट व श्री. संतोष सांगळे यांची उपस्थिती होती.

## ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री रमेश पतंगे यांना वाल्मिकी पुरस्कार जाहीर



छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- हिंदू रिसर्च फाउंडेशन ही नागपूरस्थित स्वयंसेवी संस्था २०२२ पासून समाजाच्या विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी वेदकाळातील सप्तर्षींच्या नावे पुरस्कार देते. विश्वकर्मा, महर्षी वाल्मिकी, आचार्य भारद्वाज, आचार्य कणाद, आचार्य सुश्रुत, नागार्जुन आणि आर्यभट्ट या सात ऋषींच्या नावे हे पुरस्कार आहेत. अल्पावधीतच प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या या पुरस्कारांमधील ऋषी वाल्मिकी यांच्या नावे दिला जाणारा २०२५ चा पुरस्कार, हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष, साप्ताहिक विवेकचे माजी संपादक, ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री रमेश पतंगे यांना घोषित झाला आहे. रमेश पतंगे यांनी लेखनाच्या माध्यमातून गेली अनेक दशके केलेल्या वैचारिक प्रबोधनाच्या कार्याची ही आणखी एक पोचपावती आहे. या पुरस्काराने विवेक समूहाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. हा पुरस्कार येत्या ५ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे समारंभपूर्वक देण्यात येईल. यापूर्वी हा वाल्मिकी पुरस्कार पद्मविभूषण डॉ. एस. एल. भैरप्पा आणि महाकवी सुधाकर गायधनी यांना प्रदान करण्यात आलेला आहे.

जगभरातील सर्व मानव आणि विशेषत: हिंदू धर्माच्या अनुयायांच्या धर्मादाय, शैक्षणिक, नैतिक, सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी एक व्यासपीठ आणि निधी उभारणे, सार्वजनिक व्याख्याने, चर्चासत्रे, संगोष्ठी, संशोधन उपक्रम, शास्त्रार्थ इत्यादी आयोजित करून हिंदू धर्माचा प्रचार करणे, हिंदू तत्त्वज्ञानाचा अधिक वैज्ञानिक, संघटित आणि प्रामाणिक पद्धतीने सखोल अभ्यास सुलभ करण्यासाठी हिंदू अभ्यासासाठी अध्यासन स्थापन करणे, विज्ञान, साहित्य आणि अध्यात्माच्या विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या प्राचीन संत आणि ऋषींच्या नावाने नोबेल पुरस्कारांच्या सदृश्य पुरस्कार देणे, आदी उद्दिष्ट्ये घेऊन हे फाउंडेशन कार्यरत आहे. डॉ. टि. एस. भल हे फाउंडेशनचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त आहेत आणि अन्य विश्वस्त हे विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी आहेत.

## स्मार्ट वीज मीटर बसवण्यास अडथळा; महावितरणच्या पथकास अरेरावी करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- स्मार्ट वीज मीटर बसवण्यास अडथळा आणून महावितरणच्या पथकास अरेरावी करणाऱ्या छत्रपती संभाजीनगरातील तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणच्या वतीने सध्या सर्व वीज ग्राहकांना अत्याधुनिक स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटर बसविण्याचे काम शहरासह संपूर्ण जिल्ह्यात सुरू आहे. ३ सप्टेंबर रोजी दुपारी बीड बायपासवरील जैन इंटरनशनल शाळेजवळच्या जबिंदा स्क्वेअर या वसाहतीमध्ये जुने विद्युत मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू होते. त्या ठिकाणी सातारा शाखेचे सहायक अभियंता संतोष सुर्वे हे त्यांच्या सहकाऱ्यांसह गेले. मात्र तेथील रहिवाशी भारती अशोक जगदाळे यांनी 'तुम्ही कुठून आलेले आहात. तुमचे इथे काय काम आहे. तुमचे शासकीय ओळखपत्र दाखवा,' अशी मोठमोठ्या आवाजात अरेरावीच्या भाषेत विचारणा केली. महावितरण कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र दाखवले असता 'हे असे हस्तलिखित ओळखपत्र बाहेर ५० रुपयात बनवून भेटतात. हे बनावट ओळखपत्र आहे. शासकीय शिक्का देखील खोटा आहे,' असे म्हणत वाद घातला. सुर्वे यांनी महावितरणच्या सहायक अभियंता वसुधा येलपुला यांना फोनद्वारे माहिती देताच त्या घटनास्थळी हजर झाल्या. त्यांनी भारती जगदाळे व त्यांच्यासोबत तेथील रहिवासी अमृतकर व आशिष यांना समजावून सांगितले. मात्र 'आम्ही विद्युत मीटर बदलू देणार नाही. तुम्हाला जे करायचे ते करा,' असे म्हणत आरोपींनी येलपुला यांनाही अरेरावी केली.

विद्युत कायद्यानुसार विद्युत मीटर हे महावितरणची मालमत्ता असून, केंद्र शासनाच्या धोरणानुसारच स्मार्ट मीटर बसवण्याचे कामकाज शहरात सर्वत्र सुरू आहे. मात्र जबिंदा स्क्वेअर येथील भारती अशोक जगदाळे, अमृतकर व आशिष या तिघांनी स्मार्ट वीज मीटर बसवण्याच्या शासकीय कामकाजात अडथळा आणला. त्यामुळे सहायक अभियंता संतोष सुर्वे यांनी सातारा पोलिस ठाणे गाठून रीतसर फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून तिन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गणेशोत्सव निमित्त श्री स्वामी समर्थ केंद्रात श्री गणपती अथर्वशीर्ष वाचनाला प्रतिसाद

वैजापूर दि.४ (प्रतिनिधी)- येथील स्वामी समर्थ केंद्रात माजी आमदार कै.आर.एम.वाणी यांनी वर्ष २००६मध्ये स्थापन केलेल्या 'श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक मंडळाच्या'वतीने गुरुवार (ता.०४) रोजी सायंकाळी सहा ते सात वाजेपर्यंत श्री गणपती अथर्वशीर्ष वाचन करण्यात आले, या वाचन कार्यक्रमात स्वामी समर्थ सेवक मोनिका गंडे यांनी सामूहिक रित्या वाचन केले पुरुष व महिला सेवेकरी एकुण २०३ सेवकांनी सहभाग घेऊन आपली सेवा स्वामी समर्थ चरणी अर्पण केली. एक





तास हा वाचन कार्यक्रम सुरू होता. स्वामी सेवक व मंडळाचे अध्यक्ष सचिन वाणी,लिमेश वाणी, देविदास वाणी, जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, अरविंद तुपे,उत्कर्ष अनर्थे,बापूसाहेब गावडे,संकेत वाणी,तुषार आनार्थ, त्राहाािषाोश राजपूत,रोहित गुळस्कर ,अक्षय वाणी, श्री महापुरे यांनी सहभाग नोंदविला.या प्रसंगी उपस्थित सर्व सेवेकरीना धोंडीरामसिंह राजपूत यांनी निर्माल्य ािलहेवाट, स्वच्छता, पर्यावरण प्रदूषण, वृक्षारोपण.श्री गणेश विसर्जन शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.श्री विसर्जन मिरवणूक पारंपरिक वाद्य लावूनच काढावी असे आवाहन केले.नगर पालिकेने तयार केलेले कृत्रिम तलावात गणपती विसर्जन करण्याचे आवाहन ही राजपूत यांनी केले.श्री .गणपती अथर्वशीर्ष वाचनाला शहराच्या सर्व भागातील सेवेकरी यांची मोठी उपस्थिती होती.

## स्मार्ट सिटी बस डेपोत ग्राहक डिझेल पंपाचे उद्घाटन; शहर बस सेवेसाठी महत्त्वाचे पाऊल

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- जाधववाडी येथील स्मार्ट सिटी बस डेपोमध्ये डिझेल पंपाचे उद्घाटन गुरुवार, ४ सप्टेंबर रोजी करण्यात आले. मनपा आयुक्त, प्रशासक आणि स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. श्रीकांत यांच्या हस्ते हा पंप सुरू करण्यात आला. यामुळे शहरातील १०० डिझेल बसेसना इंधन पुरवठा करणे सोपे होणार आहे, जे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक कार्यक्षम आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य बनवण्यासाठी महत्त्वाचे आहे.

या पंपाद्वारे इंधन खरेदी केल्यामुळे स्मार्ट सिटीला दरमहा ३ ते ४ लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाची बचत होण्याची अपेक्षा आहे. सध्या स्मार्ट सिटीच्या १०० बसेससाठी दरमहा सुमारे १.५ लाख लिटर डिझेल लागते. या पंपासाठी लागणाऱ्या आवश्यक




परवानग्या आणि तांत्रिक प्रक्रिया भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) ने पूर्ण केल्या आहेत, त्यामुळे स्मार्ट सिटीला यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च करावा लागलेला नाही.

यावेळी स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. श्रीकांत यांच्यासह अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर संतोष वाहुळे, मुख्य चालन व्यवस्थापक संजय सुपेकर, लेखा अधिकारी अनिलदत्त कोथळीकर, सहाय्यक व्यवस्थापक प्रमोद देशमुख, सहाय्यक व्यवस्थापक विलास काटकर, डेपो मॅनेजर श्याम महाजन, प्रकल्प व्यवस्थापक स्नेहा नायर, किरण आढे आणि अरिहंत गर्ग बीपीसीएल क्षेत्र व्यवस्थापक, छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते.

यावेळी जी. श्रीकांत यांनी आगामी पीएमई बस सेवा प्रकल्प डेपोच्या कामाचा आढावा घेतला. तसेच, याठिकाणी मेकॅनिक, चालक, वाहक आणि बस कर्मचाऱ्यांसाठी विश्रांतीगृह, स्वच्छतागृह आणि आगामी इलेक्ट्रिक बससाठी चार्जिंग स्टेशनच्या कामासाठी इमारती बांधकामाची पाहणी केली.

## हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जरजरी जर बक्ष उरूस व ईद-उल-मिलादुन्नबी निमित्त अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांनी दर्गा परिसराचे घेतले आढावा



छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- खुलताबाद येथे हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जरजरी जर बक्ष रह.यांच्या उरूस तसेच ईद-उल-मिलादुन्नबी निमित्त मोठ्या प्रमाणात खुलताबाद नगरीत भाविकांची गर्दी अपेक्षित असल्याने आज दि.४ स्पटेंबर रोजी अप्पर पोलीस अधीक्षक अर्नापूर्णा सिंह यांनी खुलताबाद शहर व परिसरातील पाहणी करून आढावा घेतला. यावेळी पोलीसङ निरीक्षक धनंजय फराटे यांनी ही खुलताबाद परिसरातील संवेदनशील ठिकाणांची पाहणी करून अनेक ठिकाणी बॅरिकेटिंग लावण्याच्या सूचना दिल्या. सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या भागांमध्ये अतिरिक्त पोलीस तैनात करण्यात येणार असून, शांती व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात येत आहेत.

## (पान १ वरुन)

### सातारा गॅझेटिअरबाबत निर्णय न झाल्यास रस्त्यावर...

कोणाला केले तरी मला काय करायचं आहे? तो माझा विषय नाही. माझा विषय आरक्षण आहे मी त्यात कुठून पडलेलो आहे, असे म्हणत त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, कोणी कितीही आमच्यात संभ्रम निर्माण केला. तरी माझा समाज कोणावर विश्वास ठेवत नाही आणि मी देखील कोणावर विश्वास ठेवत नाही. कारण माझ्या समाजाला माहित आहे की जे आता बोंबलत आहेत, संभ्रम निर्माण करत आहेत हे आधी कुठे झोपलेले होते? हे आधी का येत नाहीत? बैठकांना बोलवल्यावर येत नाहीत. मुंबईत बोलवल्यावर येत नाहीत, हे कशातच नसतात. हे फक्त टीव्हीवर असतात. मला हे अभ्यासक बोलवायचे देखील नव्हते. मराठा समाजाची देखील हीच इच्छा होती. पण, मुंबईतील काही बांधव बोलले की, आपण त्यांना विश्वासात घेऊन सोबत घेतले पाहिजे त्यामुळे त्यांना बोलावले. परंतु हे संभ्रम निर्माण करतात. मराठा समाजात संभ्रम निर्माण होणार नाही. मी मराठवाड्यातला सर्व मराठा समाज आरक्षणात घालणार आहे. थोड्याच दिवसात मराठ्यांना हे दिसणार आहे. त्यामुळे मराठ्यांनी संभ्रम निर्माण करून घेऊ नये. पश्चिम महाराष्ट्रात असलेल्या सातारा गॅझेटिअरबाबत देखील सरकारने हयगय करता कामा नये, जर हे झाले नाही तर तुम्हाला मी पुन्हा रस्त्यावर फिरणे बंद करेल, असा इशारा त्यांनी यावेळी राज्य सरकारला दिला.

### मराठा समाजाचा जीआर सरसकटचा नाही

जीआरमुळे ओबीसी समाजाला कोणताही धक्का बसणार नाही. हा सरसकट जीआर नाही. हा पुराव्याचाच जीआर आहे. फक्त मराठवाड्यात इंग्रजांचा राज्य नव्हते. तिथे निझामाचे राज्य होते. त्यामुळे इंग्रजांच्या राज्यातील पुरावे हे इतर ठिकाणी मिळतात, तसे मराठवाड्यात मिळत नाहीत. मराठवाड्यातील पुरावे हे निजामाच्या म्हणजे हैदराबाद गॅझियटरमध्ये मिळतात. त्यामुळे तेथील पुरावे आपण ग्राह्य धरले. त्यामुळे जे खरे कुणबी असतील त्यांनाच हे आरक्षण मिळेल असे फडणवीस म्हणाले.

### जीएसटीमध्ये बदल करणे हा स्वातंत्र्यानंतरचा सर्वात...

जास्त बचत करण्यासाठी बदल केले आहेत, त्यांचे आयुष्य चांगले बनविले आहे, असे मोदी म्हणाले.

२२ सप्टेंबरपासून हे बदल लागू होतील. २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यानंतरचा हा सर्वात मोठा बदल आहे. पूर्वी ज्या वस्तू उच्च कर स्लॅबमध्ये होत्या त्या आता बहुतेक ५टक्के आणि १८टक्के च्या स्लॅबमध्ये येतील. यामुळे हॉटेल, प्रवास, आवश्यक वस्तू या सर्वच आवाक्यात येणार आहेत. देशातील तरुणांना फिटनेस क्षेत्रातील बदलांचा फायदा होईल. जिम, सलून, योगा... या सेवांवरील कर कमी करण्यात आला आहे, याचा अर्थ आपले तरुण तंदुरुस्त राहतील, असे मोदी म्हणाले.

### नागपूरमधील ओबीसी महासंघाचे साखळी...

आहे. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाच्या मागण्यांबाबत आम्ही सकारात्मक आहोत. १८ महामंडळ तयार केली आहेत. ५-५ कोटी रुपयांचा निधी दिलाय, आता ५०-५० कोटी निधी प्रत्येक महामंडळाला देणार आहोत. जिल्ह्याच्या ठिकाणी ओबीसींसाठी अभ्यासिका सुरु करु. महामंडळांना एक हजार कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी म्हटले.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १२ मागण्या आज सरकारने मान्य केल्या आहेत. आता आपण आपले उपोषण मागे घ्यावे अशी विनंती मंत्री अतुल सावे यांनी बबनराव तायवाडे यांना केली. यानंतर बबनराव तायवाडे यांनी उपोषण थांबवल्याची घोषणा केली. दरम्यान, एक महिन्याच्या आत ओबीसींच्या सर्व मागण्यांचे शासन आदेश काढले जाईल, असे आश्वसन अतुल सावे यांनी दिले.

### भारत, चीनला धमकाविणाऱ्या अमेरिकेला पुतिन...

पुतिन यांनी आरोप केला की, अमेरिका आयातशुल्क आणि व्यापारी निर्बंधाचा वापर जगातील मोठ्या देशांना नमविण्यासाठी करत आहे. 'इतिहासात अनेक समस्यांचा सामना करत या देशांतील विद्यमान नेतृत्व उभे राहिलेले आहे. या नेतृत्वाला कमकुवत करणे अयोग्य ठरेल', असे पुतिन म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, भारतासारख्या देशात १५० कोटींची लोकसंख्या आहे. दुसऱ्या बाजूला चीनसारखा चांगली अर्थव्यवस्था असलेला देश आहे. या दोन्ही देशांचे स्वतःचे कायदे आणि राजकीय व्यवस्था आहे.

### युएस कोर्टात टॅरिफवरून खटला सुरू

टॅरिफ लादण्यास मान्यता दिली होती.' 'स्थानिक न्यायालयाने टॅरिफविरोधी निर्णय देताना असा प्रश्न उपस्थित केला नाही की, या संकटांमुळे 'राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण किंवा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला' धोके निर्माण होतात, ज्यामुळे राष्ट्राध्यक्षांना आपत्कालीन निर्णय घेण्यासाठी पुरेसे अधिकार आहेत', असेही याचिकेत म्हटले आहे.

## अल्पवयीन मुलगी बेपत्ता; माहिती कळविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)- पैठण येथून दि. २१ ऑगस्ट रोजी ब्युटी पार्लरला जाते असे सांगून गेलेली अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली असून

या मुलीस फूस लावून पळवून नेले असल्याबाबत फिर्याद पैठण पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. त्यानुसार अनिकेत उद्धव कनसे रा. फकीरवाडा पैठण याचे विरुद्ध भारतीय न्याय संहिता १३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलीस उपनिरीक्षक पी.बी.यादव यांनी कळविले आहे.

यामुलीचे नाव भारती गणेश सानप असे असून रंग गोरा, उंची ५ फुट ६ इंच, अंगात पांढऱ्या व गुलावी रंगाचा पंजाबी ड्रेस, व पांढरा स्कार्प, काळी सॅडल. असे असून या वर्णनाची मुलगी आढळल्यास पैठण पोलीस स्टेशनचे निरीक्स्हक एम.बी. गोमारे - ९०४९९८०७५५ व पोलीस उपनिरीक्षक पी. बी. यादव -९७६७७०७६५१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.


### छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, ई-निविदा सुचना

जा.क्र./मनपा/ई- निविदा/२०२५/२४२
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक :- ०४.०९.२०२५

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा भरण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर पाणी पुरवठा योजनेवरील फारोळा जल शुध्दीकरण केंद्र व नवीन जायकवाडी येथे एल.ई.डी. लाईटस व टयुब लाईटस चा पुरवठा करणे. | १०.०९.२०२५ |
| २ | शहर पाणी पुरवठा योजना-फारोळा जलशुध्दीकरा केंद्रातील साठवण टाकी व सीसीटी चेंबरची स्वच्छता व अनुषंगीक कामे करणे. | १२.०९.२०२५ |
| ३ | शहर पाणी पुरवठा योजना- ढोरकीन पंपगृह येथील साठवण टाकीची स्वच्छता व अनुषंगीक कामे करणे. | १२.०९.२०२५ |
| ४ | वार्ड क्र. ९२ विश्रांतीनगर अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची वार्षिकतत्वा वर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | १२.०९.२०२५ |
| ५ | वार्ड क्र. ८९ चिलकलठाणा अंतर्गत जलनिःसारण वाहिनीची वार्षिक तत्वावर दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे. | १२.०९.२०२५ |
| ६ | नाथ सुपर मार्केट व्यापारी संकुल दुकान क्र. ०९ | १२.०९.२०२५ |
| ७ | नाथ सुपर मार्केट व्यापारी संकुल दुकान क्र. ११ | १२.०९.२०२५ |
| ८ | शहर पाणी पुरवठा योजना – नक्षत्रवाडी येथील ७५ लक्ष लि. व ४५ लक्ष लि. क्षमतेचे संतलुन जलकुंभाची स्वच्छता करणे व अनुषंगीम कामे. | १२.०९.२०२५ |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे वतीने योग्यत्या वर्गातील ठेकेदारांकडून ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेची विस्तृत माहिती संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत/ -
सिस्टीम मॅनेजर (ई-निविदा)
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका